REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# पानझड मधील स्त्रीरूपे

डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक , मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

**प्रस्तावना :**

ना. धो. महानोर यांच्या काव्यलेखनाची सुरूवात १९६० पासून झालेली दिसते. 'रानातल्या कविता' हा महानोरांचा पहिला संग्रह १९६७ ला प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'वही'(१९७१), 'पावसाळी कविता' (१९८२), 'प्रार्थना दयाघना' (१९९०), 'पानझड' (१९९७), 'गाथा शिवरायांची' (१९९८), 'तिची कहाणी' (२०००) असे सौंदर्याकडून वास्तवाच्या दिशेने त्यांच्या काव्याचा प्रवास सुरू आहे, असे जाणवते.




'पानझड' या कविता संग्रहात कवितेचे अंतःप्रवाह स्पष्ट दिसतात. संग्रहाच्या सुरूवातीला काही दुःखी मनाच्या कविता आल्या आहेत. तर दुसऱ्या भागामध्ये काही गीते-लावण्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तर तिसऱ्या भागामध्ये पालखीचे अभंग आहेत, असे 'पानझड' या कवितासंग्रहाचे स्वरूप आहे. ग्रामीण जीवन चित्रणाच्या दृष्टीने 'पानझड' हा कविता संग्रह खूप महत्त्वाचा आहे. ग्रामीण जीवनातील चालीरीती, रूढी, परंपरा, सण-समारंभ, नाते संबंधातील पीळ खेड्यातील नायक शेतकरी, त्याचे कुटुंब, निसर्ग विविध पिके पशु-पक्षी, रोज बोलली जाणारी बोलीभाषा असे ग्रामीण जीवनातील अनेक घटक या कवितेने अधोरेखित केले आहेत. त्यातही ग्रामीण स्त्री जीवनाची विविध रूपे 'पानझड' मध्ये साकार झाली आहेत. कधी आई, बहीण, मैत्रीण, प्रेयसी अशा अनेक रूपाने ती कवितेत येताना दिसते.

निसर्गात जरी झाडाच्या आधारानं
वेल वाढत असली
तरी आपल्या चाळीस वर्षाच्या आयुष्यात
वेलीच्या आधारानंच
झाड जगण्या-वाढण्याच आधारित घडलं
ते तुझ्यामुळेच

अशी कविता संग्रहाची अर्पण पत्रिका त्यांनी सौ. सुलोचना यांना अर्पण केली आहे.

कविला आधार देणारी, कुटुंबावर अपार प्रेम करणारी, प्रेमळ, श्रद्धाळू मुकपणे दुःख सोसणारी, येणाऱ्या संकटावर मात करणारी, टिकून राहणारी कमालीची सहनशीलता असणारी, मातीशी इमान राखणारी, माणूसपण जपणारी, कवीला प्रेरणा देणारी आई या आईच्या दुःखी करून कहाणीने या कविता संग्रहाची सुरूवात होते. कवी आपल्या आईविषयी म्हणतो,

''पीठ गळे जात्यातून
तस पाणी डोळ्यांतून
आई करपले हात
तुझी भाकरी भाजून''

असे ग्रामीण स्त्री जीवनानुभवाचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत पहावयास मिळते.

खेड्यात आई–वडील, बहीण–भाऊ, सासू–सासरा, सासू–सून, मामा–भाचा अशी नाती महत्त्वाची मानली जातात. अशी नाती जीवनात सांभाळली जातात. नात्यातला आदर राखला जातो. अशा नात्यातला पीळ घट असतो. बहीण भावाच्या नात्यातील ओलावा एका कवितेत आला तो असा.

मुळान माती सोडावी तशी नाती तुटत चालली आहेत. पूर्वीसारखी नाती घट्ट राहिली नाहीत. आता नात्याची विन सैल होत चालली आहे. या बद्दल कवी खंत व्यक्त करताना दिसतो.

नका उकलू पोरीनो त्या जुन्या आठवणी
माझ्या वल्या काळजाला ना सोसत कहाणी.

प्रियकराची वाट पाहून तिचे थकलेले डोळे, तिचा रूसवा, प्रियकराची अनामिक ओढ, त्याच्या दूर जाण्याने झालेला विरह नंतर मिलन तृप्त अशा तरूणीच्या मनातील आंदोलने, त्याच्या बऱ्याच कवितेत आली आहेत. अशीच एक नाजूक मैना त्याच्या कवितेत आली आहे. गोजिरवाण्या मैनेच्या मनातील धडपड कवींनी व्यक्त केली आहे.

''माळ्याच्या मळ्यात न् मैना नाजूक येकली
जाईच्या फुलाची न् बाई काचोळी गुंफली
चंद्र माळून मोकळ्या केसात
रात सजली उन्हाचा ऐन्यात''

विरहाने व्याकूळ झालेल्या नायिकीनीच्या मनातील दाहकता याची प्रचिती करून देणारी आणखी एक कविता महत्त्वाची आहे. तिच्या मनातील अलवार भावना कवीनी अगदी हळुवारपणे उलगडून दाखिवल्या आहेत. तुमच्याविना हे जग उदास आहे. तुम्ही सोडून जावू नका अशी ती प्रियकराला विनंती करते.

संसारात रमलेल्या लावण्यवतीचा प्रणय उत्कटपणे उजळपणे व्यक्त केलेल्या भावना त्यांच्या कवितेत पाहावयास मिळतात. पतीला परमेश्वर मानने, त्याचा आदर करणे हे भारतीय स्त्रीचे वैशिष्ट्ये. साजण बोलला नाही तर ती अस्वस्थ होते. तिच्या मनात अनेक विचार येतात. आपल्या पतीला ती बोलण्याविषयी विनंती करते. तुम्ही अबोला का धरीला म्हणून ती विचारते.

रात्र उलटून गेली तसा तो आला नाही. त्याच्या आठवणीने ती व्याकूळ झाली आहे. पतीविषयी तिच्या मनात लटका राग आहे. आपणाला सोडून परस्त्रीकडे हा साजण गेला असेल का? असे तिला वाटते. तिच्या मनात संशय येतो. ती धीटपणे आपल्या पतीला विचारते,

''गळाभर मोती माझे
अंग बाजू बंद
तरी कुण्या कोकिळेचा
जडला छंद?
ऐकते भी डोळे तिचे, पाईडा भारी
कुठं तुम्ही गेला होता सांगा कारभारी?

गोबऱ्या गालाची, मंजूळ बोलीची, निळ्याभोर डोळ्याची, निरागस अशी नायिका प्रियकराच्या आठवणींनी मोहरून गेली आहे. तिच्या रूप सौंदर्याचे वर्णन कवितेत आले आहे ते असे.

अशा निरागस मुली कधी माळ्याच्या मळ्यातील नाजूक मैना, तर कधी सजणाला निमंत्रण देणारी लावण्यवती, मला सोडून जावू नका म्हणून प्रियकराला विनवणी करणारी स्त्री, कुटुंबाचा आधार बनून राहिलेली स्त्री, अपार कष्ट करणारी पण

दुःखाची कुठेही वाच्छता न करणारी स्त्री, कधी आई बनून तर कधी बहीण या नात्याने अशा वेगवेगळ्या रूपात ग्रामीण स्त्री जीवनाचे दर्शन 'पानझड' मधून घडते.

कामवासनेकडे निर्मळपणे पाहणारी व श्रमाची प्रतिष्ठा राखणाऱ्या ग्रामीण स्त्री जीवनाची गहनता त्यांच्या कवितेत पाहावयास मिळते. मुळातच ''महानोराच्या कवितेमधून घडणाऱ्या स्त्रीचे दर्शन तसे ठरवून एक लक्षी नाही.'' दिवसात कष्टात नांदणारी आणि श्रद्धेने दिवे तेजाळू नभाला भूमीवर ठेवणारी तिची स्थिती ही साकारतात. निसर्गातील वेगवेगळ्या प्रतिमा वापरून स्त्रीचे वेगवेगळी रूपे ते वाचकासमोर उभी करतात. एवढेच नव्हे तर बऱ्याच ठिकाणी निसर्ग आणि स्त्री एकमेकात बेमालूमपणे मिसळून गेल्या आहेत. हे घडत असताना महानोर सारखा नितळ मनाचा कवी जेव्हा श्रृंगार मांडतो. तेव्हा तो बीभत्स कधीच नसतो.

तर उलट लावण्यवतीचे रूपवतीनं व तिच्या मनाची भावनिक आंदोलने वाचकांना एका वेगळ्या प्रेम विश्वात घेवून जातात. स्त्रीच्या आधारे फुललेल्या प्रीतीचा प्रवास बाहेरून 'आत' आला पाहिजे, सकामतेकडून निष्कामतेकडे झाला पाहिजे, शरीरापासून आत्म्यापर्यंत झाला पाहिजे, प्रीतीचे वात्सल्यात, प्रीतीचे भक्तीत रूपांतर झाले पाहिजे. अशी जीवनाला उन्नत करणारी दृष्टीही त्याच्या कवितेमध्ये जाणवते ते तितकेच खरे आहे.

## संदर्भसूची

१) पानखड, ना. धो. महानोर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९७.
२) महानोरांची कविता, श्रीकांत देशमुख, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृ. ३६२, आ. २००३.
३) महानोरांची कविता, श्रीकांत देशमुख, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृ. ३१८, आ. २००३.
४) महानोरांची कविता, श्रीकांत देशमुख, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृ. २८०.
५) ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन, वामन जाधव, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, आवृत्ती २००७